INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 7.560 (SJIF 2024)

# अस्मितादर्श चे वाङ्मयीन व सांस्कृतिक योगदान

## (Literary and Cultural Contribution of Asmitadarsh)

**डॉ. रमेश जाधव**
प्राध्यापक,
मराठी भाषा व वाङ्मय विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
छ. संभाजीनगर (महाराष्ट्र, भारत)
E-mail: prof.rameshjadhav2021@gmail.com

**DOI No. 03.2021-11278686 DOI Link :: https://doi-ds.org/doilink/04.2024-36167839/IRJHIS2404062**

**प्रास्ताविक :**

पद्मश्री डॉ. गंगाधर पानतावणे हे मराठी साहित्यविश्वातील सिध्दहस्त संपादक आणि मूर्धन्यसमीक्षक म्हणून सुविख्यात असून विदर्भ ही त्यांची जन्मभूमी तर मराठवाडा ही कर्मभूमी आहे डॉ. पानतावणे यांचा जन्म २८ जून १९३७ रोजी नागपूर येथे झाला, तर २७ मार्च २०१८ रोजी ते औरंगाबाद येथे (छ. संभाजीनगर) कालवश (स्मृतिशेष) झाले. २०१८ साली त्यांना भारत सरकारने पद्मश्री हा किताब बहाल करून गौरान्वित केले. ते सॅन होजे अमेरिका येथे संपन्न झालेल्या पहिल्या विश्व मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षही होते. १९६२ साली ते मिलिंद महाविद्यालयात मराठी विषयाचे अधिव्याख्याता म्हणून रुजू झाले पुढे १९८१ ला मराठवाडा विद्यापीठातील मराठी भाषा व वाङ्मय विभागात अधिव्याख्याता म्हणून ते सेवारत झाले आणि याच ठिकाणाहून ते प्राध्यापक व विभागप्रमुख म्हणून३० जून १९९७ साली सेवानिवृत्त झाले.

**अस्मितातादर्शची जडणघडण :**

डॉ. गंगाधर पानतावणे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचार व तत्त्वज्ञानाला शिरोधार्य मानणारे ज्ञान तपस्वी होते. आंबेडकरी तत्त्वज्ञान आणि विचार हा त्यांचा ध्यास व श्वास होता. १९६२ साली मिलिंद महाविद्यालयात अध्ययन व अध्यापनाचे कार्य करीत असताना त्याठिकाणी काही सहविचारी सहकार्यांसोबत त्यांची ओळख झाली. त्याठिकाणी रा. ग. जाधव, प्रा. ल. बा. रायमाने, प्राचार्य म. ना. वानखेडे, सुखराम हिवराळे यांच्या सहवासात ते आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या मिलिंद महाविद्यालयात एखादे आंबेडकरी विचाराचे मुखपत्र असावे या विचारातून १९६७ साली ‘अस्मिता’ या नावाचे एक नियतकालिक सुरू करण्यात आले. त्याचे पहिले संपादक डॉ. म. ना. वानखेडे होते. तर कार्यकारी संपादक रा. ग. जाधव आणि सहायक म्हणून गंगाधर पानतावणे, ल. बा. रायमाने, सुखराम हिवराळे हे होते या नियतकालिकाचे काही अंक प्रारंभी निघाले. पुढे ‘अस्मिता’ बंद

पडले. १९६८ साली 'अस्मिताचे' 'अस्मितादर्श' असे नामकरण झाले आणि त्याचे संपादक व शिलेदार डॉ. गंगाधर पानतावणे झाले. १९६८ पासून निरंतरपणे 'अस्मितादर्श' प्रसिद्ध होत आहे. आज या इवल्याशा रोपट्याचे महाकाय बोधीवृक्षात रुपांतर झाले आहे 'दलित साहित्याचे मुखपत्र' म्हणून 'अस्मितादर्श' ने आपली साममुद्रा कोरली आहे. 'अस्मितादर्श'ने दलित साहित्य व बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानाला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली आहे १९६८ ते २०१७ पर्यंत डॉ. गंगाधर पानतावणे हे प्रस्तुत नियतकालिकाचे संपादक होते; तर जानेवारी २०१८ पासून त्यांची कन्या डॉ. निवेदिता पानतावणे ह्या 'अस्मितादर्श'च्या संपादिका आहेत. हे 'प्रागतिक विचार संस्थे'चे त्रैमासिक असून ते महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने पुरस्कृत केलेले निखळवाङ्मयीन नियतकालिक म्हणून सुविख्यात आहे 'अस्मितादर्श' संदर्भात डॉ. जनार्दन वाघमारे लिहितात, "मराठी साहित्याच्या इतिहासात 'अस्मितादर्श'ने दलित युग निर्माण केले. दलित साहित्य चळवळीला वर्धिष्णू बनविण्याचे ऐतिहासिक कार्य डॉ. पानतावणे यांनी अस्मितादर्शच्या माध्यमातून केले. एक वाङ्मयीन नियतकालिक म्हणून अस्मितादर्शचे अनन्यसाधारण महत्त्व आहेच. पण ते साहित्यपीठही आहे." अशा या पीठाचे आद्य कुलपती डॉ. गंगाधर पानतावणे हे आहेत डी. बी. जगत्पुरिया यांच्या मते, "डॉ. गंगाधर पानतावणे अस्मितादर्श विद्यापीठाचे कुलगुरू आहेत"

'अस्मितादर्श' चे गेल्या छपन्न वर्षांत साधारणत: दोनशेवीस अंक प्रकाशित झाले असावे. कारण हे 'त्रैमासिक' स्वरूपाचे नियतकालिक आहे. 'अस्मितादर्शला हवे आंबेडकरावादी साहित्य मुखवट्याचे साहित्य नको.' हे प्रस्तुत नियतकालिकाचे ब्रीदवाक्यही आहे आणि भूमिकाही याच भूमिकेला बांधील राहून डॉ पानतावणे ह्यांनी अस्मितादर्शचे निकोप संपादन केले आणि याच भूमिकेशी प्रामाणिक राहणाऱ्या लेखक, कवी, समीक्षक आणि विचारवंतांचे लेखन सतत प्रसिद्ध केले.

आपल्या भूमिकेशी आजही 'अस्मितादर्श' तेवढाच बांधील आहे; याची प्रचिती प्रस्तुत नियतकालिकामधील प्रसिद्ध झालेले लेखन देते. या संदर्भात अर्जुन डांगळे म्हणतात, "एवढी वर्षे एखादं वाङ्मयीन नियतकालिक मग ते त्रैमासिक का असेना निकोप बांधीलकीने आणि सातत्याने चालविणे ही साधी सोपी गोष्ट नाही. विशेषतः कोणतेही आर्थिक पाठबळ नसतांना मातब्बर संस्था पाठीशी नसतांना. 'अस्मितादर्श' हे दलित चळवळीचं व्यासपीठ असलं तरी डॉ. पानतावणे यांनी आपला संपादकीय तोल ढळू दिला नाही. सवंग लिखाण आणि लोकप्रियता त्यांनी टाळलेली दिसते."

उपरोक्त विधान गेल्या छपन्न वर्षांत 'अस्मितादर्श' मध्ये प्रसिद्ध झालेले लेखन व संपादकीय पाहता योग्य वाटते. असे हे वाङ्मयीन नियतकालिक दलितांच्या सांस्कृतिक व सामाजिक चळवळीचे केंद्र आहे त्यामुळेच डॉ. शंकरराव खरात यांनी अस्मितादर्शला 'दलितांचे गॅझेट' असे अभिमानाने संबोधिले आहे. या संबोधनावरून 'अस्मितादर्श'चे निराळेपण ध्वनित होते. दलित साहित्याशी असलेली बांधीलकी समजते.

**अस्मितादर्शचे योगदान :**

डॉ. गंगाधर पानतावणे यांनी सुरू केलेल्या 'अस्मितादर्श' या त्रैमासिकामधून सातत्याने कथा, कविता, आत्मपरलेखन ह्या ललित लेखनासोबतच वैचारिक आणि संशोधनविषयक लेखनही मोठ्या प्रमाणात प्रसिद्ध झाले आहे. १९६८ पासून कित्येक नवोदित कवी, लेखक या त्रैमासिकातून उदयाला आले व पुढे नामांकित साहित्यिक म्हणून ते प्रसिद्ध झालेयाचे संपूर्ण श्रेय अस्मितादर्शला जाते

**अस्मितादर्श मधील कथा :**

प्रस्तुत त्रैमासिकाने सातत्याने लघुकथा प्रसिद्ध केलेली आहे. या नियतकालिकामधून केशव मेश्राम, शंकरराव खरात, योगिराज वाघमारे, भास्कर चंदनशिव, अमिताभ, वामन होवाळ, प्रतिमा इंगोले, जगदीश कदम, अशोक कोळी, सुरेश जाधव, भीमसेन देठे, उर्मिला पवार, रा. रं. बोराडे, संध्या रंगारी हे तत्कालीन नवोदित आणि आज प्रस्थापित झालेले आणि विविध प्रवाहांचे मानकरी असणाऱ्या या लेखक, लेखिकांचे कथालेखन अस्मितादर्शने प्रसिद्ध केले. ह्या व इतर अनेक कथालेखकांना घडविण्यात अस्मितादर्शाचे खूप मोठे योगदान आहे. विशेषत: आज आपण ज्या कथेला 'दलित कथा' असे संबोधितो ती कथा याच पत्रिकेमधून अधिक्याने प्रसिद्ध झालेली आहे. साठोत्तरी दलित साहित्यातील कथाप्रकाराला सबळ व सुदृढ करण्यात प्रस्तुत नियतकालिकाचे खूप हातभार आहे. किंबहुना या त्रैमासिकामुळेच दलित कथेचे पुढे बोधिवृक्षात रूपांतर झाले. वेदना, विद्रोह आणि नकार हे ह्या कथेचे विशेष आहेत. ही कथा भगवान बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांशी बांधीलकी ठेवणारी आहे. सामाजिक भान या कथेला असून लोकप्रबोधन हा तिचा उद्देश आहे. आपला काळाकुट्ट भूतकाळ या कथेने शब्दबद्ध केलेला आहे. वंचित, नवोदित लेखकांची कथा डॉ. पानतावणे यांनी अहर्निश प्रसिद्ध केली. तिला विचारमंच दिले. दलित कथा म्हणून प्रस्थापित केले. त्यामुळेच 'अस्मितादर्श कालखंड' असा डॉ. इंदुमती शेवडे यांनी'मराठी कथा उगम आणि विकास' या समीक्षाग्रंथात यथार्थ उल्लेख केलेला आहे. या उल्लेखावरून 'अस्मितादर्श'ची मौलिक कामगिरी आणि अद्वितीय योगदान लक्षात येते.

**अस्मितादर्श आणि कविता :**

१९६८ पासून शेकडो वंचित घटकांतील नवोदित कवींच्या काव्यलेखना सोबतच अभिजन वर्गातील नवोदित कवींच्या कविताही अस्मितादर्शने सातत्याने प्रसिद्ध केलेल्या आहेत. 'अस्मितादर्श' मधील कवितांचा आशय सामाजिक स्वरूपाचा असतो. अस्मितादर्श मध्ये प्रसिद्ध झालेल्या कविता म. फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यातत्त्वज्ञानाशी एकरूप झालेल्या दिसतात. वंचित समाजातील लोकांच्या वेदना आणि समस्या या कवितेने अधोरेखित केल्या आहेत. वेदना, विद्रोह आणि नकार या कवितेच्या मुळाशी आहेत सामाजिक बांधीलकी व्यक्त करणारी ही कविता असून साठोत्तर दलित कवितेच्या प्रवाहाला बळकट आणि विस्तारित करणारी ही कविता आहे. दलित साहित्याचा प्रवाह या कवितेने रूढ केलेला आहे. पारंपरिक मराठी कवितेपेक्षा अस्मितादर्शमधील कविता आशयाभिव्यक्ती, जाणिवा, तत्त्वज्ञान या अंगाने भिन्न आहे. डॉ. आंबेडकर यांचे कार्य व विचार या कवितेची प्रेरणा असून दलित साहित्य प्रवाहाला प्रस्थापित करणारी ही कविता आहे. १९६८ पासून महाराष्ट्रातील अनेक कवींच्या कविता अस्मितादर्शने ठळकपणे प्रसिद्ध केल्या. तेव्हाचे हे नवोदित कवी पुढे प्रस्थापित झाले. नामवंत व प्रतिभावंत कवी म्हणून ते नावारूपास आले याचे सारे श्रेय अस्मितादर्शला जाते. कवी कुसुमाग्रज, फ. मुं. शिंदे, प्रभा गणोरकर, बापूराव जगताप, वसंत डहाके, नामदेव ढसाळ, तांबोळी लक्ष्मीकांत, केशव देशमुख, वामन निंबाळकर, भ. मा. परसवाळे, दया पवार, केशव मेश्राम, भुजंग मेश्राम, आत्माराम राठोड, प्रज्ञा लोखंडे, त्र्यंबक सपकाळ, भगवान सवाई ह्या व इतर कित्येक कवींच्या कविता अस्मितादर्शने सातत्याने प्रसिद्ध केल्या. हे कवी जसे वंचित घटकातील आहेत तसेच काही अभिजनही आहेत मराठीतील विख्यात कवी फ. मुं. शिंदे यांची पहिली कविता अस्मितादर्शनेच प्रसिद्ध केली आहे. एकंदर, साठोत्तरी दलित प्रवाहाला धवल करणारी अस्मितादर्शमधील कविता मराठी कवितेच्या प्रवाहालाही बलिष्ठ करते.

**अस्मितादर्श आणि आत्मकथनपर लेखन :**

साठोत्तरी काळात दलित तरुणांनी आपल्या वेदना आणि आक्रोशाला आत्मनिवेदनपर अशा गद्य लेखनाच्या माध्यमातून उजागर केले. पुढे हेच लेखन 'दलित आत्मकथन' या संज्ञेने रूढ झाले. एक नवी संकल्पनाच अस्मितादर्शने जन्माला घातली. 'दलित आत्मकथन' हा साहित्यप्रकार रूढ करण्यात प्रस्तुत त्रैमासिकाचा सिंहाचा वाटा आहे. अस्मितादर्श मधून अनेक वंचित घटकातील लेखकांचे आत्मकथनपर लेखन क्रमशः प्रसिद्ध झालेले दिसते. पुढे या लेखनाने मराठी साहित्यात क्रांती घडवून आणली. दलित साहित्याच्या प्रवाहास समर्थ करण्यास या लेखनाने खूप मोलाची कामगिरी केली आहे. याचे सर्व श्रेय डॉ. पानतावणे आणि त्यांच्या अस्मितादर्शलाच द्यावे लागेल. अस्मितादर्श मधील आत्मकथनपर लेखन व लेखकाचा उल्लेख करताना प्र. ई. सोनकांबळे यांचा 'आठवणींचे पक्षी' शरणकुमार लिंबाळे कृत 'अक्करमाशी', 'गावकी' रुस्तुम अचलखांब, भगवान इंगळे यांचा 'ढोर', 'आयरणीच्या घना' वैजनाथ कळसे हे व इतर अनेक वंचित घटकांतील लेखकांचे कथन क्रमश: अस्मितादर्श मधून प्रसिद्ध झालेले आहेत. पुढे मग सावकाश हेच लेख 'आत्मकथन' म्हणून ग्रंथरूपाने प्रसिद्ध झाले या लेखनामुळे दलित साहित्यात 'आत्मकथन' हा वैशिष्ट्यपूर्ण साहित्यप्रकार उदयाला आला. याचे श्रेय अस्मितादर्शला जाते. अस्मितादर्शने १९८३ साली प्रसिद्ध केलेला 'दलित आत्मकथा' हा विशेषांक याची साक्ष पटवितो. "या पत्रिकेने महाराष्ट्रात 'दलित प्रबोधनयुग' सुरू केले. दलितांना अस्मिता मिळून दिली. त्यांचे भूमिगत जीवन पहिल्यांदाच मोठ्या प्रमाणात मराठी साहित्यात आले. याचा आक्रोश पहिल्यांदा कानावर पडला." डॉ. जनार्दन वाघमारे यांचे प्रस्तुत विधान लक्षवेधक असून 'अस्मितादर्शचे कर्तृत्व दर्शविणारे आहे.

**अस्मितादर्श मधून प्रसिद्ध झालेले नाट्यलेखन व एकांकिका आणि संगीतिका :**

'अस्मितादर्श' मधून आत्मकथन, कथा, कविता, लेखनासोबतच एकांकिका आणि नाट्यलेखनही प्रसिद्ध झालेले आहेत. दलित साहित्यामधील अनेक प्रथितयश नाट्यलेखकांना जन्माला घालण्याचे श्रेयही प्रस्तुत पत्रिकेला जाते. दलित नाटककारांनी वंचितांचे जीवन नाटकातून साकारले. आपल्या हक्कापासून वंचित ठेवणाऱ्या व्यवस्थेचा या नाटककारांनी खरपूस समाचार घेतला. पारंपरिक वर्णव्यवस्था नाकारली. पुराण प्रतिमांचा आणि मिथकांचा यथार्थ उपयोग करून वंचितांच्या अत्याचाराला नाट्यरूप दिले. दलित नाटक व एकांकिकांनी वंचितांच्या शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि आर्थिक प्रश्नांची यथार्थ दखल घेतली. आत्मभान, आत्मटिका आणि आत्मशोध ही दलित नाटकाची वैशिष्ट्ये होत. डॉ. गंगाधर पानतावणे यांच्या मते, "दलित समस्या आणि दलित जीवनानुभवाचे विदारक सत्यदर्शन हेच दलित नाट्यसृष्टीचे प्रयोजन आहे" याच भूमिकेतून अस्मितादर्शने किसनफागू बनसोडे यांचे 'सनातनी धर्माचा पंचरंगी तमाशा' दत्ता भगत लिखित पराभव, सूड, अष्मक, एकटी, खेळिया, प्रेमानंद गज्वी यांचे 'हे राम', 'वादळाचे पंख', 'घोटभर पाणी', भीमसेन देठे यांच्या 'आई' 'बांडगूळ', रामदास कांबळे लिखित 'पसायदान', रुस्तुम अचलखांब रचित 'रायरंद' 'कात्यायनी', 'विशाखा' योगीराज वाघमारे कृत 'अगाजि घडलेची नाही' 'बारव', रामनाथ चव्हाण यांचे 'एकच पाणवठा' 'तोलक', भि. शि. शिंदे यांची 'सूर्यफूल' इत्यादी दलित प्रश्न आणि समस्या अधोरेखित करणाऱ्या एकांकिका आणि नाटक प्रसिद्ध केले. यामुळे १९८० नंतर दलित रंगभूमीची प्रस्थापना होऊ शकली पुढे तिचे रूपांतर 'बोधी रंगभूमी'त झाले. याचे थोडेफार श्रेय गंगाधर पानतावणे यांच्या 'अस्मितादर्शला' जरूर द्यावे लागेल.

भ. बुद्ध यांच्यागृहत्यागावरील 'दिगंतर' ही फ. मुं. शिंदे रचित संगीतिका १९८० साली अस्मितादर्शने प्रसिद्ध केलेल्या

दिवाळी अंकामधून प्रकाशित झालेली आहे याशिवाय रुस्तुम अचलखांब यांचाही संगीतिका अस्मितादर्श मध्ये प्रसिद्ध झाल्याची दिसते.

**अस्मितादर्श मधील इतर लेखन :**

प्रस्तुत पत्रिकेने ललितलेख, ग्रंथानुवाद, काव्यनिर्मिती विषयक साहित्य, वैचारिक लेखन, बुद्ध, फुले, आंबेडकर यांच्या तत्त्वज्ञान आणि साहित्याची मीमांसा करणारे लेख, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, विषयावरील लेखन, इतिहासाची ओळख करून देणारे साहित्य, उपेक्षित घटकांतील स्त्रियांची स्थिती दर्शविणारे लेखन, प्राचीन मराठी साहित्य आणि मराठी भाषे संदर्भातील लेखन, लोकवाङ्मय विषयक लेख, मराठी कथा, कविता, नाटक, आत्मचरित्र व आत्मकथन इत्यादी साहित्य प्रकारावरील समीक्षणात्मक लेखन, ग्रंथ परीक्षण, अस्मितादर्श साहित्य संमेलनातील अध्यक्षीय भाषणे, प्रथितयश साहित्यिकांच्या मुलाखती, विविध पत्रव्यवहार, आठवणी याशिवाय 'हलगी' या शीर्षकाचे सदरही अस्मितादर्शामधून प्रसिद्ध होत असे.

उपरोक्त उल्लेखित लेखन वाचनीय आणि विचारप्रधान असायचे. दलित साहित्याची सम्यक समीक्षा कशी असायला हवी याचे दर्शन घडविणारे हे लेखन असे. इतिहास विषयक लेखनातून दलितांच्या अस्मितेचा आणि अस्तित्वाचा शोध घेणारे लेखन अस्मितादर्शने प्रसिद्ध केले. नवोदित लेखकांच्या कलाकृतींची सम्यक ओळख वाचकांना व्हावी या उद्देशाने विविध ग्रंथांची सम्यक परीक्षणे अस्मितादर्शने प्रसिद्ध करून आपली संपादनाची कामगिरी चोख बजावली. विचारप्रधान लेखनाला प्रस्तुत पत्रिकेने विशेष प्रधान्य देऊन आपले वेगळेपण जपले. आंबेडकरी विचार व तत्त्वज्ञानाला बांधील असणारे लेखन प्रसिद्ध करण्यास अस्मितादर्शने सतत प्राधान्यक्रम देऊन आपली परिवर्तनाची ओळख प्रस्थापित केली.

अस्मितादर्शमधील संशोधनपर आणि विचारप्रधान लेखनामधून शास्त्रीय दृष्टिने सांस्कृतिक व सामाजिक समस्यांचे चित्रण केलेले असे. इतिहास शिक्षण व कला या संदर्भातही उत्तम मांडणी प्रस्तुत पत्रिकेत असायची डॉ. म. ना. वानखेडे, डॉ. सदा कऱ्हाडे, प्रा. रा. ग. जाधव, प्रभाकर पाध्ये, प्रा. दि. के. बेडेकर या महानुभवांनी विचार व संशोधनपर लेखनामधून विविध वाङ्मयीन प्रश्न मांडले. डॉ. रावसाहेब कसबे, रा. ना. चव्हाण, डॉ. भाऊ लोखंडे या व इतर अभ्यासकांनी संस्कृती व समाज याची मीमांसा केली. आजही ही उज्ज्वल परंपरा सुरू आहे

**संपादकीय आणि अस्मितादर्श :**

डॉ. गंगाधर पानतावणे हे प्रस्तुत पत्रिकेचे संस्थापक संपादक होते साहित्य, समाज आणि संस्कृतीचे ते गाढे अभ्यासक आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचार व तत्त्वज्ञानाला ते शिरोधार्थ मानत असे. संपादकीय लेखातून त्यांनी परिवर्तनवादी भूमिकेतून वेळोवेळी सामाजिक व वाङ्मयीन प्रश्न व समस्यांची दखल घेतली. या पत्रिकेमधील संपादकीय समकालीन घटना, घडामोडींच्या यथार्थ दर्शन घडविणारे असे. मृत्युलेख तर गहिवरून टाकणारे असायचे वंचितांवर होणाऱ्या अन्याय व छळाचे ते संपादकीय मधूनखरपूस समाचार घ्यायचे. "अस्मितादर्शच्या संपादकीय मधून डॉ गंगाधर पानतावणे यांचा आंबेडकरीबाणा स्पष्टपणे दृग्गोचर होतो." प्रा. दत्तानंद इंगोले यांचे प्रस्तुत विधान अस्मितादर्शमधील संपादकीय लक्षात घेता यथार्थ वाटते.

**अस्मितादर्शचे विशेषांक :**

प्रस्तुत पत्रिकेने अनेक विशेषांक प्रसिद्ध केले. हे विशेषांक संग्रही ठेवावेत असे असून त्यांना संशोधनमूल्य लाभले आहे. हे

अंक डॉ. पानतावणे यांच्या निकोप वाङ्मयीन दृष्टी आणि कलात्मकतेचा प्रत्यय देतात. 'अस्मितादर्शने' भारतीय संविधान विशेषांक, कन्नड, गुजराथी, दलित साहित्य विशेषांक, शिक्षण साहित्य व संस्कृती विशेषांक, दलित स्त्री विशेषांक, दलित शाहीर व शाहिरी विशेषांक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्मशताब्दी विशेषांक, म. जोतिबा फुले विशेषांक, बाबुराव बागुल, केशव मेश्राम, शंकरराव खरात, दि. मा. खैरकर, भालचंद्र फडके हे आणि इतर विशेषांक प्रसिद्ध केले. हे व इतर विशेषांक डॉ. पानतावणे यांच्या सामाजिक बांधिलकी आणि प्रगाढ साहित्य प्रेमाची साक्ष देतात. संशोधकांना उपयोगी पडावे असेहे विशेषांक आहेत. डॉ. मीरा घांडगे यासंदर्भात लिहितात, "अस्मितादर्शचे वैविध्यपूर्ण नवीन दुर्लक्षित विषयांवरील विशेषांक स्वतंत्र संदर्भग्रंथ आहेत." म्हणूनच कोलंबिया विद्यापीठाने अस्मितादर्शचे सर्व अंक डिजिटायझेशन करून वेबसाईटवर टाकण्याचे ठरविले आहे.

अस्मितादर्शची आणखी एक दखलपात्र कामगिरी म्हणजे दरवर्षी दिवाळी अंक प्रसिद्ध करणे हे होय. या अंकाद्वारे दलित कविता, कथा, सोबतच विचारप्रधान लेखनही प्रसिद्ध केले जात असे. या विविध विषयांवरील विशेषांक आणि दिवाळी अंकाने दलित साहित्याला लौकिक मिळवून दिले. अस्मितादर्शचे दिवाळी अंक खूप दर्जेदार असतात. यामुळेच मुंबई मराठी पत्रकार संघाचा रत्नाकर देसाई सर्वोत्कृष्ट अंकाचा पुरस्कार १९७६ साली अस्मितादर्श दिवाळी अंकास प्राप्त झाला होता.

**अस्मितादर्श मेळावे आणि संमेलने :**

डॉ. पानतावणे खूप कल्पक आणि वैचारिक भान असलेले सव्यसाची संपादक होते. 'अस्मितादर्श'च्या माध्यमातून केवळ लेखनप्रपंच प्रकाशित करणे एवढेच त्यांनी ध्येय उराशी न बाळगता सदर पत्रिकेच्या माध्यमातून त्यांनी लेखक-वाचक मेळावे आणि १९७४ पासून साहित्य संमेलन आयोजित करून साहित्य, समाज, संस्कृती व समकालीन प्रश्न आणि समस्यांवर परिसंवाद व चर्चा घडवून आणली. 'अस्मितादर्श' साहित्य संमेलनाचा अध्यक्ष पद मिळणे हे अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदापेक्षाही मोठे भूषण साहित्यिक समजत असत. विशेषतः वंचित घटकांतील साहित्यिकांना हे मिळावे व संमेलन एकपर्वणीच वाटायची. साहित्य पंढरीचे स्वरूप या मेळावे आणि संमेलनास प्राप्त झाले होते. महाराष्ट्रातील विविध प्रदेशात राहणारे साहित्यप्रेमी या मेळावे आणि संमेलनास स्वखर्चाने उपस्थिती दर्शवित. नवोदित साहित्यिकांना या उपक्रमामुळे विचारपीठ लाभले. पुढील अनेक पिढ्यांची सांस्कृतिक जडणघडण करण्याचे काम ह्या मेळावे नि संमेलनाने केले. यासंदर्भात डॉ. विलास तायडे म्हणतात, "अस्मितादर्श साहित्य संमेलन हे केवळ हौशे-नवशांची मिरवणारी गर्दी नसून ती सरांच्या दूरदृष्टीपणामुळे मानवतावादी विचार जपणाऱ्या दर्दी मंडळीची कार्यशाळा होती." तर डॉ. जनार्दन वाघमारे लिहितात, "अस्मितादर्श लेखक मेळाव्यांनी दलित साहित्य संमेलनाची व्याप्ती वाढवली.. मेळाव्याचे विषय सामाजिक सांस्कृतिक व आर्थिक स्वरूपाचे असत.' उपरोक्त दोन्ही मान्यवरांच्या विधानावरून अस्मितादर्श आयोजित लेखकमेळावे व संमेलनाचे विशेष ध्यानात येते आणि आगळे योगदानही कळते. आतापावेतो जवळपास ३६ अस्मितादर्श साहित्य संमेलने संपन्न झालीत.. हा एक विक्रमच म्हणावा लागेल. प्रथितयश साहित्यिकांप्रमाणेच अस्मितादर्शने उत्तम साहित्य रसिकही निर्माण केले. साहित्यिकांना उमेद मिळावी यासाठी अस्मितादर्शने दरवर्षी संपन्न होणाऱ्या संमेलन व मेळाव्यात चांगल्या कलाकृतींना पारितोषिक देण्याची प्रथा रूढ केली. ही अस्मितादर्शची कामगिरी प्रशंसनीय आहे. आजही अस्मितादर्श पुरस्कार मिळणे खूप सन्मानाचे मानले जाते. यासंदर्भात ताराचंद्र खांडेकर लिहितात, "अस्मितादर्श मेळावे, संमेलने, आंबेडकरी सांस्कृतिक क्रांतीचा आरसा आहे."

**समारोप :**

डॉ. म. ना. वानखेडे यांनी मिलिंदच्या परिसरात आणि नागसेनवनातील भूमित 'अस्मिता' या नावाचे लावलेले रोपटे पुढे 'अस्मितादर्श' म्हणून लौकिकास आले. डॉ. गंगाधर पानतावणे यांनी संपादकाची धुरा समर्थपणे उचलून या पत्रिकेचे बोधीवृक्षात रूपांतर केले. आंबेडकरी विचार व कार्य प्रेरणास्थानी माणून डॉ. पानतावणे यांनी एकखांबी 'अस्मितादर्श' पत्रिकेची चळवळ समर्थपणे पदरमोड करून जोपासली. वंचितांचे साहित्य या पत्रिकेने विनामूल्य प्रसिद्ध केले. अनेक दलित व इतरही समाजातील नवोदितांना कोणताही भेदभाव नकरता विचारपीठ मिळवून दिले. आज हेच लेखक प्रस्थापित झाले आहेत. दलित साहित्य चळवळीचे मुखपत्र म्हणून प्रस्तुत पत्रिकेची कामगिरी अभिमानास्पद अशी आहे साठोत्तर दलित साहित्याच्या चळवळीला मजबूत आणि दणकट करण्यात या नियतकालिकाचे मौलिक योगदान आहे. अस्मितादर्शने वाचक व लेखक मेळावा आणि साहित्य संमेलन आयोजित करून साहित्य चळवळीला 'लोकचळवळ' बनवली. उपेक्षित घटकांतील साहित्यिकांना पुरस्कार देऊन त्यांना लेखन करण्यासप्रोत्साहित करून प्रवृत्त केले. या पत्रिकेने प्रसिद्ध केलेल्या विशेषांकांना संदर्भमूल्य लाभले असून संशोधकांना ते उपयोगी पडतील अशा स्वरूपाचे आहेत पुरोगामी व आधुनिक महाराष्ट्राच्या साहित्य व सांस्कृतिक मशागतीत अस्मितादर्शचे मौलिक योगदान असून वंचित घटकातील साहित्यिकांना प्रकाशनाचे कोणतेही माध्यम उपलब्ध नसणाऱ्या काळात अस्मितादर्शचा उदय झाला. त्यामुळे वंचितांना विचारपीठ उपलब्ध झाले. त्यांच्या शब्दांना पंख मिळाले मराठी साहित्य विश्वात या पत्रिकेने क्रांती घडविली. प्राचार्य राम शेवाळकर यांच्या मते, "दलित साहित्याच्या संदर्भात अस्मितादर्शचे कार्य तर युगप्रवर्तकच म्हणावे लागेल. दलित वर्गातील सर्व उमलत्या पण अव्यक्त अंकुरांना अस्मितादर्शने प्रकाशाचे व आकाशाचे दर्शन घडविले. जुन्या पूर्वसुरींचा परिचय घडवून दिला." प्रस्तुत पत्रिकेसंदर्भातील शेवाळकरांचा हा अभिप्राय सार्थ असाच आहे.

**निष्कर्ष :**

१. अस्मितादर्श हे साठोत्तरी दलित साहित्याचे मुखपत्र म्हणूनप्रस्थापित झाले असून दलित जाणिवा व जीवन अभिव्यक्त करणारे साहित्य त्यातून प्रसिद्ध झाले आहे.

२. साहित्य, समाज, धर्म, इतिहास, शिक्षण, अर्थकारण अशा अनेक विषयांवरील लेखन अस्मितादर्शने प्रसिद्ध केल्याचे लक्षात येते.

३. अस्मितादर्शने प्रकाशित केलेल्या विशेषांकांनासंदर्भमूल्य लाभले आहे

४. अस्मितादर्शने वंचित घटकातील नवोदित कवी लेखकांना हक्काचे विचारपीठ उपलब्ध करून दिले नंतरच्या काळात याच मंडळींनी साहित्य प्रांतात आगळेवेगळे स्थान निर्माण केले.

५. अस्मितादर्शने आंबेडकरी विचारांशी बांधीलकी ठेवल्यामुळे मराठी नियतकालिकाच्या इतिहासात आपली वेगळी छाप सोडली आहे.

६. विचार प्रधान वाङ्मयीन पत्रिका हे भान ठेवून सामाजिक बांधीलकी जपणाऱ्या लेखकांच्या लेखनाला अस्मितादर्शने प्राधान्य दिले.

७. संपादकीय लेखातून वाङ्मयीन व सामाजिक विषयावर अस्मितादर्शनी अभ्यासपूर्ण मांडणी केली आहे

८. अस्मितादर्शमधील संपादकीय लेख प्रबोधनपर व विचारप्रवर्तक आहेत.

९. अस्मितादर्शने केवळ दलित लेखक, कवींनाच लेखनास प्रवृत्त केले नाही तर सर्वच घटकांतील कवी-लेखकांना स्वतंत्र विचारमंच उपलब्ध करून दिले.

१०. अस्मितादर्शने भ. बुद्ध, म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार व तत्वज्ञानाचा अंगीकार करणाऱ्या साहित्यिकांना विशेष स्थान दिले.

११. अस्मितादर्श फक्त नियतकालिक नाही तर ती एक वाङ्मयीन व सामाजिक आणि सांस्कृतिक चळवळ आहे.

१२. वंचितांची व्यथा, वेदना आणि समस्या अभिव्यक्त करणाऱ्या विद्रोही, ललित लेखनाला अस्मितादर्शने विशेषत्वाने स्थान दिले.

१३. चातुर्वर्ण्य व्यवस्था नाकारणारे समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या जीवनमूल्याचा पुरस्कार करणाऱ्या लेखनाला प्रस्तुत पत्रिकेने महत्त्व देऊन प्रसिद्ध केले.

१४. अस्मितादर्शने केवळ ललित व वैचारिक आणि संशोधनपर साहित्यातच प्रसिद्ध केले नाही तर लेखक-वाचक मेळावे घेतले. अस्मितादर्श साहित्यसंमेलन आयोजित केले आणि अस्मितादर्श पुरस्कारही देऊन कवी-लेखकांचा यथोचित सन्मानही केला.

१५. अस्मितादर्श दलित साहित्य चळवळीचा दर्पण आहे.

१६. अस्मितादर्शची कामगिरी मराठी वाङ्मयीन नियतकालिकाच्या इतिहासात खूप मौलिक आहे.

१७. दलित साहित्य, आंबेडकरी विचार तत्त्वज्ञान आणि अस्मितादर्शचा अतूट संबंध आहे

१८. कविता या ललित लेखनास अस्मितादर्शने मोठ्याप्रमाणात प्रसिद्धी दिलेली आहे.

१९. दलित साहित्यातील प्रथितयश व लौकिक प्राप्त बहुतांश कवी, कथा व नाट्यलेखक आणि समीक्षक हे अस्मितादर्शचे उत्पादन आहेत.

**संदर्भग्रंथ सूची:**


१. डॉ. जाधव मनोहर व इतर (संपादक) – साहित्य, समाज आणि संस्कृती, सुविद्या प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २००६
२. डॉ. घांडगे मीरा - अस्मितादर्श सूची, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २००८
३. डॉ. कांबळे चिंतामण- अस्मितादर्श : साहित्य आणि संस्कृती, सुविद्या प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २००३
४. प्रा. जाधव रा.ग. (संपादक) - मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड सातवा, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, प्रथमावृत्ती २०११
५. डॉ. पानतावणे निवेदिता (संपादक) – अस्मितादर्श, डॉ. गंगाधर पानतावणे अभिवादन विशेषांक, जाफिमा २०१८
६. रणपिसे - दलितांची वृत्तपत्रे, महाराष्ट्र बौद्धसाहित्य परिषद, पुणे, प्रथमावृत्ती १९६२
७. कानडे रा. गो. - मराठी नियतकालिकांचा इतिहास, कर्नाटक पब्लिशिंग हाऊस, मुंबई.
८. डॉ. विवेकी रमेश (संपादक) - प्रवर्तन (डॉ. गंगाधर पानतावणे गौरव ग्रंथ), अक्षरवेल पब्लिकेशन लातूर, प्रथमावृत्ती २०१६
९. डॉ. गजभिये अनिल – अस्मितादर्शी समीक्षा, श्री अहिल्या प्रकाशन, इंदौर, प्रथमावृत्ती २००८
१०. रफिक सुरज - लघुनियतकालिकांची वर्णनात्मक सूची, लोकवाङ्मयगृह, मुंबई, प्रथमावृत्ती २०११
११. चौधरी प्रवीण (संपादक) - प्रबोधन (अस्मितादर्श साहित्यसंमेलन विशेषांक) डिसेंबर २०११